आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
८ एप्रिल २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी, घरांच्या बांधकांसाठी ५ ब्रास वाळू मोफत मिळणार

- एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक धोरणांतर्गत महाराष्ट्र आणि विदर्भ ग्रामीण बँकेचं एकत्रीकरण

- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, काल झालेलं निम्मं नुकसान भरुन निघालं

**आणि**

- आयपीएलमध्ये लखनौ सुपर जायंट्सचं कोलकाता नाईट रायडर्स पुढं २३९ धावांचं आव्हान

<><><><><>

राज्य मंत्रीमंडळानं आज नवीन वाळू धोरणाला मंजुरी दिली. याअंतर्गत घरांच्या बांधकामांसाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नव्या धोरणात डेपो पद्धत बंद करुन वाळू घाटांची निविदा काढली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - चंद्रशेखर बावनकुळे**

धरणांमधून वाळू उत्खनन करुन त्यांची क्षमता वाढवण्यावरही आजच्या बैठकीत चर्चा झाल्याचं ते म्हणाले. मंत्रीमंडळाच्या पुढच्या बैठकीत कृत्रिम वाळू धोरण आणलं जाणार असून दगडापासून ही वाळू बनवण्याचं

नियोजन आहे. यापुढे सर्व सरकारी बांधकामांसाठी हीच वाळू वापरण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले.

शेतीसंबंधी वादावर तोडगा काढण्यासाठी असलेल्या सलोखा योजनेला २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याची घोषणाही त्यांनी केली. शेतजमिनीचा ताबा, वहिवाटी, कुटुंबातले वाद अशा प्रकरणावर सलोखा योजनेच्या माध्यमातून तोडगा काढला जातो.

राज्यातल्या सिंधी स्थलांतरितांच्या ३० वसाहतींना राज्य सरकारनं मंजुरी दिली. इथल्या नागरिकांकडून घर खरेदी केलं तेव्हाचा रेडी रेकनर दर आणि ५ टक्के शुल्क तर व्यावसायिक मालमत्तांसाठी १० टक्के दरानं शुल्क आणि रेडी रेकनर आकारणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आणि पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

**<><><><><>**

येत्या पाच वर्षांत राज्यातल्या सर्वच भागांचा संतुलित विकास झाल्याचं दिसेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत ‘इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट २५’ या कार्यक्रमात बोलत होते.

राज्यात गुंतवणुकीसाठी विनाअडथळा सुविधा पुरवल्या जात आहेत. राज्याच्या सर्वच भागात गुंतवणूक व्हावी, यासाठी परिसंस्था तयार केली जात आहे. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करत असून

त्यासाठी कौशल्य विद्यापीठ कार्यरत आहे. हरित आणि स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांवरही आम्ही भर देत आहोत, असं ते म्हणाले.

यावेळी MMRDA नं वित्त पुरवठ्यासाठी ४ लाख ७ हजार कोटी रूपयांचे सामंजस्य करार केले.

**<><><><><>**

एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक तत्वानुसार ४३ प्रादेशिक बँकांच्या एकत्रिकरणाची अधिसूचना केंद्रीय वित्तीय सेवा विभागानं जारी केली आहे. त्यानुसार, राज्यात विदर्भ प्रादेशिक ग्रामीण बँक, महाराष्ट्र प्रादेशिक ग्रामीण बँकेत विलीन केली जाईल. १ मे पासून हे विलिनीकरण प्रत्यक्षात येईल. या एकत्रित बँकेचं मुख्यालय छत्रपती संभाजीनगरमधे असेल.

प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या एकत्रीकरण प्रक्रियेचा हा चौथा टप्पा आहे. अर्थ मंत्रालयानं गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एकत्रीकरण योजना सुरू केली. सर्व संबंधितांशी चर्चा केल्यानंतर, १० राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २६ प्रादेशिक ग्रामीण बँकांचं विलीनिकरण करण्यात आलं. सध्या, २६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून ४३ प्रादेशिक ग्रामीण बँका कार्यरत आहेत. एकत्रीकरणानंतर त्यांची संख्या २८ वर येईल. मात्र देशभरातल्या, ७०० जिल्ह्यांमध्ये मिळून त्यांच्या २२ हजारापेक्षा जास्त शाखा असतील.

**<><><><><>**

पंढरपूर इथल्या विठ्ठल मंदिरात वारीच्या वेळी होणाऱ्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

केला जाणार आहे. या तंत्रज्ञानाची चाचणी आज पंढरपुरात घेण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गर्दीचं प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेहरे ओळखण्याच्या प्रणालीद्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेल्यांचा शोध घेणं शक्य होणार आहे. तसंच, एखाद्या विशिष्ट ठिकाणी गर्दीची घनता जास्त आढळल्यास त्याविषयी तात्काळ सूचना मिळू शकणार आहे.

<><><><>

जळगाव महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात तहसीलदारांच्या बनावट सही आणि शिक्क्यांचे दाखले सादर केल्याच्या घोटाळ्यात पोलिसांनी २ मुख्य संशयित वकीलांना न्यायालयानं ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. महानगरपालिकेला तहसील कार्यालयातून ५० जन्म-मृत्यू दाखले प्राप्त झाले होते. या दाखल्यांवरची तहसीलदारांची सही आणि शिक्के बनावट असल्याचा संशय आल्यानं ही तक्रार करण्यात आली होती.

<><><><>

जगभरातल्या बाजारातली तेजी आणि रिझर्व्ह बँकेकडून उद्या पाव टक्के व्याजदर कपातीची आशा यामुळे देशातल्या शेअर बाजारांनी काल झालेलं निम्मं नुकसान आज भरुन काढलं. तीन दिवसानंतर तेजीत बंद झालेला सेन्सेक्स आज १ हजार ८९ अंकांची वाढ नोंदवून ७४ हजार २२७ अंकांवर बंद झाला. निफ्टी पावणे ४०० अंकांच्या वाढीसह २२ हजार ५३६ अंकांवर स्थिरावला.

वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, माहिती तंत्रज्ञान, सरकारी कंपन्या, वाहन, बांधकाम उद्योग क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज वधारले. युरोपियन बाजार आज ३ टक्क्यांपर्यंत, जपानी बाजार ६ टक्क्यांपर्यंत वधारले होते. अमेरिकी बाजारातही थोडीफार तेजी होती.

सोन्याचे दर आज तोळ्यामागे ५०० रुपयांनी घसरले आणि २२ कॅरेट सोनं ९१ हजार २०० रुपये तोळ्यानं विकले जात होतं. चांदीचे दर ९० हजार ३०० रुपये किलो दरावर जवळपास समान होते.

<><><><><>

अकोला जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत काल विविध ९५ व्यवसायांबरोबर १ हजार २३८ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. जिल्ह्यात गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण तयार झाल्याचं यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी म्हटलं.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या जानमपल्ली इथं विहिरीचं खोदकाम करताना माती अंगावर पडल्यानं ढिगाऱ्याखाली दबून दोन मजुरांचा मृत्यू झाला. दोन्ही मृतदेह बाहेर काढण्याचं काम सुरू आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या नेकनूर - येळंब घाट रस्त्यावर काल रात्री अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

<><><><><>

सोलापूर विद्यापीठातली रिक्त पदं तातडीने भरण्यात यावी असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले आहेत. तसंच विद्यापीठ परिसरात अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याची निर्मिती येत्या १५ मे पर्यंत पूर्ण करावी, असंही त्यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत सांगितलं.

<><><><><>

पुणे महापालिका २२ कोटी रुपयांची थकबाकी भरण्यासाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला नोटीस बजावणार आहे. धर्मदाय कायद्यानुसार मिळकत करामध्ये सवलत द्यावी, या मागणीसाठी रूग्णालय प्रशासन २०१७ मध्ये न्यायालयात गेलं आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही, तसंच न्यायालयानं कर वसुलीला स्थगिती दिलेली नाही.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर सुरु असलेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सनं कोलकाता नाईट रायडर्सपुढं विजयासाठी २३९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून कोलकाता नाईट रायडर्सनं प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. निकोलस पूरनच्या ८७, मिशेल मार्शच्या ८१ धावांच्या जोरावर लखनौचा डाव २० षटकात ३ बाद २३८ धावांवर संपला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायर्डसच्या १६ षटकात ६ बाद १८५ धावा झाल्या होत्या

स्पर्धेतला आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. पंजाबमधे मोहाली इथं थोड्याच वेळात,

साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. पंजाबनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या बहुतांश भागात पुढचे दोन दिवस तापमान वाढण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, कोकणात बहुतांश भागात हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. विदर्भात अकोला, अमरावती, चंद्रपूरमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात घाटमाथ्यावर विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता वेधशाळेने वर्तवली आहे.

**//<><><><><>//**